CNR : MHNS110041622021

**नियमित दि.दावा क्र.३३०/२०२१**
*श्री. बाळु फकिरा सोनवणे.*
*विरुध्द*
*श्री. शिवाजी विठोबा सोनवणे/३.*

**निशाणी क्र.०८ खालील आदेश**
( *पारीत दिनांक ०६/०३/२०२४* )

प्रस्तुत अर्ज वादी यांनी दि.प्र.सं.चे आदेश २६ नियम ९ प्रमाणे कोर्ट कमिशनरचे नेमणुकीकरता दि.०८/०९/२०२१ रोजी सादर केला.

२) वादीचे थोडक्यात म्हणणे येणेप्रमाणे :

मौजे मांजरगांव, ता. निफाड, जि. नाशिक येथील गट क्र.६६ एकुण क्षेत्र ५ हे. २३ आर पोटखराबा ०.०६ आर या मिळकतीतील पुर्वेकडील दक्षिणोत्तर क्षेत्र २ हे. ५६ आर व पोटखराबा ६ आर. ही जमीन वादीचे मालकीची आहे. तसेच या गटातील ९० आर क्षेत्र प्रतिवादी क्र.१ चे मालकीचे आहे, तसेच या गटातील ९३ आर क्षेत्र प्रतिवादी क्र.२ च्या मालकीचे आहे. याच गटातुन कडवा कालवा चारी क्षेत्र ११ आर. मधुन गेलेली आहे. ते क्षेत्र कार्यकारी अभियंता कडवा कालवा यांच्या मालकीचे आहे. तसेच मौजे भुसे, ता. निफाड, जि. नाशिक येथील गट क्र.२१७ क्षेत्र ३२ आर पैकी उत्तरेकडील क्षेत्र ११ आर. ही मिळकत वादी यांचे स्वतंत्र मालकीची आहे. तसेच या गटातील २१ आर. क्षेत्र प्रतिवादी क्र.२ यांचे मालकीचे आहे. वरील मिळकती वादी व प्रतिवादी यांचे पुर्वीचे एकत्र कुटूंबाच्या खरेदी मालकीच्या आहेत. या शिवाय गट क्र.२१६, गट क्र.१०७ व गट क्र.२२३ या मौजे भुसे शिवारातील मिळकती व गट क्र.६५ ही मौजे मांजरगांव शिवारातील मिळकत एकत्र कुटूंबाच्या आहेत. वरील मिळकतीचे वाटप वादी व त्यांचे भाऊ म्हणजेच प्रतिवादी क्र.१ ते ३ यांचे वडील यांचे दरम्यान सन २००२ मध्ये सरसनिरस मानाने झालेले असुन त्याप्रमाणे महसुल

अभिलेखात हक्क नोंद ९३४ व १५०२ झालेले आहे. मौजे मांजरगांव येथील गट क्र.६६ ही मोठया क्षेत्राची जमीन आहे. तसेच त्या गटाची व भुसे येथील गट क्र.२१७ ची ७/१२ उताऱ्याची महसुल अभिलेखाप्रमाणे मोजणी करण्याची व त्यानुसार पोटहिस्याची हद्द कायमस्वरुपी करण्याबाबत वादी व प्रतिवादी यांचे दरम्यान वेळोवेळी चर्चा झालेली होती व आहे. त्यानुसार प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी पोट हिश्याची मोजणी करण्याचे मान्य केले होते. परंतु मोजणी अर्जाचे परिशिष्ट 'अ' मध्ये संमतीसाठी सहया करण्यास प्रतिवादी यांनी नकार दिला. त्यानंतर वादी यांनी ग्रामपंचायत भुसे येथे जावून महात्मा गांधी तंटामुक्ती समिती भुसे यांना अर्ज केला असता सदर तंटामुक्तीचे सदस्य गट क्र.६६ मध्ये आले व त्यांनी पाहणी केली आणि पोट हिस्सा मोजणी करता प्रतिवादींना सहया देण्यास सांगीतले. तेंव्हा प्रतिवादी यांनी मांजरगांव शिवारातील गट क्र.६६ व भुसे शिवारातील गट क्र.२१७ ची मोजणी अर्जावर सहया करण्यास तयार असल्याचे तसेच मोजणी नंतर हददीखुणा करण्यास व एकमेकांकडे क्षेत्र निघाल्यास काढुन देण्याचे तंटामुक्ती सदस्यांसमोर कबूल केले. परंतु त्यानंतर प्रतिवादींनी पुन्हा अर्जावर सहया करण्यास नकार दिला व शिवीगाळ करुन दमदाटी केली. सदर बाबतीत तंटामुक्ती सदस्य पुन्हा प्रतिवादींना फोनद्वारे चर्चेद्वारे बोलावले असता त्यांनी वादीस कायदेशीर कारवाई करण्याचे सांगीतले. प्रतिवादी क्र.२ यानी गट क्र.६६ पैकीचे वादीचे क्षेत्रात पोट हिश्याच्या मध्यभागातील बांध फोडुन वेळोवेळी अतिक्रमण केलेले आहे. तसेच गट क्र.२१७ पैकीचे वादीचे क्षेत्रात पोट हिश्याचा पुर्वपश्चिम बांध फोडून वेळोवेळी अतिक्रमण केलेले आहे. त्यामुळे वादी उपअधिक्षक, भुमिअभिलेख यांचे कार्यालयात मिळकतीचे पोट हिश्याची मोजणी करण्याकरता गेले असता त्यांनी वादीला सांगीतले की, सहहिस्सेदाराची

संमती नसल्याने तुम्ही दिवाणी कोर्टामार्फत कमिशनर नेमुन मोजणी करा. त्यामुळे वादीला प्रस्तुत दावा दाखल करणे भाग पडले.

**३)** प्रस्तुत अर्जावर प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी कोणतेही म्हणणे सादर केले नाही त्यामुळे दि.१६/०१/२०२४ चे आदेशानुसार प्रस्तुत अर्ज त्यांचे म्हणण्याशिवाय पुढे चालविण्यात आला.

**४)** तेंव्हा वादीचा दावा हा जाहीर ठराव, निरंतर ताकीद व कोर्ट कमिशनरमार्फत पोटहिस्सा मोजणी करुन कब्जा मिळणेसाठीचा आहे. तसेच वादीला प्रतिवादी क्र.२ यांनी गट क्र.६६ मौजे मांजरगांव व गट क्र.२१७ मौजे भुसे, ता. निफाड येथील जमिनीमध्ये अंदाजे वादीचे मालकीचे अनुक्रमे २० आर व ६ आर क्षेत्रात केलेले अतिक्रमण काढुन मागीतलेले आहे. अशा परिस्थितीत गट क्र.६६ मौजे मांजरगांव व गट क्र.२१७ मौजे भुसे या दोन गटांची मोजणी करुन त्यातील पोटहिस्से व अतिक्रमण दर्शवुन अहवाल या न्यायालयासमक्ष येणे प्रस्तुत दाव्याचे अंतिम निकालाकरीता आवश्यक आहे. सबब प्रस्तुत अर्ज मंजूर करण्यास पात्र ठरतो. त्यामुळे न्याय्य हेतुने मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**-: <u>आदेश</u> :-**

१) अर्ज निशाणी क्र.८ मंजूर करण्यात येतो.

२) वादीने विनंती केल्याप्रमाणे उपअधिक्षक भुमिअभिलेख निफाड यांची कोर्ट कमिशनर म्हणून नियुक्ती करण्यात येते. त्यांना पुढे निर्देश देण्यात येतो की, शेतमिळकत गट क्र.६६ मौजे मांजरगांव, ता. निफाड ची मोजणी करुन वादी व प्रतिवादी क्र.१ त ३ यांचे ७/१२ उताऱ्यावरील महसुल अभिलेखाप्रमाणे क्षेत्राची पोटहिश्याची

हद्द कायम करावी. तसेच कोणाचे कोणाचे क्षेत्रात अतिक्रमण आहे याबाबत स्पष्ट अहवाल न्यायालयात सादर करावा.

३) तसेच वादीने विनंती केल्याप्रमाणे उपअधिक्षक भुमिअभिलेख निफाड यांची कोर्ट कमिशनर म्हणून नियुक्ती करण्यात येते. त्यांना पुढे निर्देश देण्यात येतो की, शेतमिळकत गट क्र.२१७ मौजे भुसे, ता. निफाड ची मोजणी करुन वादी व प्रतिवादी क्र.१ त ३ यांचे ७/१२ उताऱ्यावरील महसुल अभिलेखाप्रमाणे क्षेत्राची पोटहिश्याची हद्द कायम करावी. तसेच कोणाचे कोणाचे क्षेत्रात अतिक्रमण आहे याबाबत स्पष्ट अहवाल न्यायालयात सादर करावा.

४) वादी व प्रतिवादी यांनी कागदपत्रांची पुर्तता करावी.

५) वादीने नियमानुसार फी भरावी.

६) कोर्ट कमिशनर यांनी गट क्र.६६ मौजे मांजरगांव व गट क्र.२१७ मौजे भुसे, ता.निफाड, जि.नाशिक मधील वहिवाटी व तथाकथीत अतिक्रमणाबाबत स्थळनिरीक्षण करुन अहवाल या न्यायालयात सादर करावा.

७) येणेप्रमाणे वरील आदेशानुसार रिट जारी करावी व कोर्ट कमिशनर यांनी रिट मिळताच तीन महिन्यांत न्यायालयात अहवाल सादर करावा.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

सही/-

**( जे. व्ही. भेंडे )**
सह दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर,
निफाड

ठिकाण : निफाड

दिनांक : **०६/०३/२०२४**